## शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्र dydpune@gmail.com

वेब साईट क्रमांक www.dydepune.com


परिपत्रक 99692

जा.क्र. शिऊसं/उमाशि-२/रा.सीईटी/पुवि/१२
दिनांक : २८/३/२०१२ 28 MAR 2012

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या,
सर्व उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे सोलापूर अहमदनगर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये आयोजित होणा-या राष्ट्रीय स्तरावरील सामायीक प्रवेश परीक्षेबाबत विशेष सभा बोलाविण्याबाबत.

संदर्भ :- प्र.सहसंचालक,तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांचे दिनांक २७/३/२०१२ चे पत्र

शै. वर्ष २०१३-१४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय स्तरावर एकच सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) करण्यात येणार असल्याचा प्रस्ताव केंद्रिय मानव संसाधन व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सक्रीय विचाराधीन आहे. यासंदर्भात राज्याच्या धोरणांची रुपरेषा ठरविण्यासाठी मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/३/२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता सिडनेहॅम महाविद्यालय, बी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२० येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीस उपस्थित सर्व प्राचार्यांना उपस्थित राहणेबाबत सूचित करण्यात येत असून आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांठी सदरील बैठकीत राष्ट्रीय स्तरावरील सीईटी परिक्षेबाबत एकच सामायीक परिक्षा घेण्याबाबत निर्णय होणार असल्याने सदर बैठकीस उपस्थित रहावे. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक पालक संघ यांनाही सदर बैठकीस उपस्थित राहणेबाबत अवगत करावे. सदर परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर / अहमदनगर

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.
☎ /फॅक्स २५६५६२३४ **Email : : ropune.dte@gmail.com**


जा.क्र. विकापु/विवि/पदवी अभि.-प्रवेश/२०४० दिनांक : २७/०३/२०१२

प्रति,

मा. उपसंचालक,
उच्च व माध्यमिक शिक्षण संचालनालय,
आंबेडकर रोड, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये आयोजित होणा-या राष्ट्रीय स्तरावरील सामायिक प्रवेश परीक्षेबाबत विशेष सभा बोनविण्याबाबत . . . . .

संदर्भ : मा. सचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/ २०११/३९७ दिनांक २२/०२/२०१२

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भानुसार आपणंस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय स्तरावर एकच सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यात येणार असल्याचा प्रस्ताव केंद्रीय मानव संसाधन व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सक्रीय विचाराधीन आहे. **या संदर्भात राज्याच्या धोरणांची रुपरेषा ठरविण्यासाठी मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०३/२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता सिडनेहॅम महाविद्यालय, बी रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२० येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस आपण उपस्थित रहावे किंवा आपल्या प्रतिनिधीस उपस्थित राहण्यास सूचित करावे. ही विनंती.** तसेच आपल्या अधिनिस्त असणा-या उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना आणि शिक्षक पालक संधानाही उपस्थित राहण्याबाबत कृपया आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे. आपल्या सुलभ संदर्भासाठी मा. सचांलकांच्या पत्राची छायाप्रत सोबत जोडत आहे.

आपला विश्वासू,

(डी. एन. शिंगांडे)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

सोबत : वरील प्रमाणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — ३०३३३४४७ /४२२/४९१ फॅक्स -२२६९ २१०२/२२६९००७.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


महत्वाचे

क्रमांकः २अ/एडीएम/२०११/ ३९८

दिनांक : 22 MAR 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये आयोजित होणा-या राष्ट्रीय स्तरावरील सामायिक प्रवेश परीक्षेबाबत विशेष सभा बोलाविण्याबाबत.....

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०११/ प्र क्र ३३७(अ)/ तांशि-४, दिनांक २२.३.२०१२

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय स्तरावर एकच सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यात येणार असल्याचा प्रस्ताव केंद्रीय मानव संसाधन व विकास मंत्रालय,नवी दिल्ली यांच्याकडे सक्रीय विचाराधीन आहे. यासंदर्भात राज्याच्या धोरणाची रूपरेषा ठरविण्यासाठी मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक ३०.३.२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता** बैठक आयोजित करण्याचे संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

सदर बैठक **सिडनेहॅम महाविद्यालय,बी रोड,चर्चगेट,मुंबई ४०० ०२० येथे आयोजित करण्यात येणार आहे.** या बैठकीसाठी राज्यातील प्रत्येक प्रादेशिक विभागातून विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी, शिक्षकांचे प्रतिनिधी, शैक्षणिक संस्था / असोसिएशनचे प्रतिनिधी , सर्व एचएससी परीक्षा मंडळाचे प्रतिनिधी, संचालक, उच्च शिक्षण, विद्यापीठाचे प्रतिनिधी, शिक्षण तज्ञ यांना निमंत्रित करण्याचे शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यानुषंगाने आपल्या विभागाच्या अधिनस्त येणा-या उपरोक्त घटकांना आपल्या स्तरावर निमंत्रित करून तसे संचालनालयास निमंत्रितांच्या यादीसह कळविण्यात यावे. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेसंदर्भात आपल्या कार्यालयाच्या संपर्कात येणा-या शिक्षक पालक संघ किंवा तत्सम घटकांना निमंत्रित करण्यास हरकत नाही. उपरोक्त घटकानां सदर बैठकीस संबंधित संस्था/आस्थापनांमार्फत, स्वखर्चाने यावे लागेल.

उपरोक्त प्रकरणी आपण करत असलेल्या कार्यवाहीबाबत तसेच निमंत्रितांच्या यादीबाबत संचालनालयास वेळोवेळी अवगत करावे.

आपला,

( डॉ. सुभाष महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.श्री भ स वानखेडे, अवर सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई यांना संदर्भाधीन पत्रासंदर्भात माहितीस्तव सादर